**ठळक बातम्या**

- थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

- इस्त्रोच्या गगनयान मोहिमेसाठी दुसरी एकात्मिक हवाई प्रक्षेपण चाचणी यशस्वी

- नाशिक जिल्ह्यात ट्रक आणि पिकअप यांच्या अपघातात चार जणांचा मृत्यू

**आणि**

- आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीची अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. महात्मा ज्योतिबा फुले हे दूरदर्शी समाजसुधारक होते. त्यांनी देशातल्या जाती व्यवस्थेला आव्हान दिलं. महिलांसाठी शिक्षणाची दारं खुली केली. १८७३ मध्ये, त्यांनी शोषित समुदायांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ज्योतिबा फुले यांची विचारधारा समानता, न्याय आणि विवेकवादावर आधारित होती.

संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मंत्र्यांनी फुले यांना आदरांजली वाहिली.

महात्मा फुले यांनी आपले जीवन वंचित समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित केले. तसेच त्यांनी महिलांच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी दिलेलं योगदानही महत्त्वपूर्ण होतं, असं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

ज्योतिराव फुले यांच्या अथक प्रयत्नांनी अधिक न्याय्य आणि समान समाजाचा पाया घातला, असं **उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन** यांनी म्हटलं आहे.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी लिहिलेला एक लेख समाजमाध्यमांवर सामायिक केलाय. मोदींनी आपल्या श्रद्धांजलीपर संदेशात म्हटलं की महात्मा फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, ज्ञान आणि लोककल्याणासाठी समर्पित केलं. फुले यांचं जीवन नैतिक धैर्य, आत्मपरीक्षण आणि समाजाच्या कल्याणासाठी असलेल्या अढळ समर्पणाचं एक प्रेरणादायी उदाहरण आहे.

ज्योतिबा फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी अभूतपूर्व योगदान दिलं आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी अथक परिश्रम घेतले. सत्यशोधक समाजाची स्थापना करून ज्योतिबा फुले यांनी समाजात समानता, न्याय आणि सामाजिक सलोखा वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलं, अशा शब्दांत **गृहमंत्री अमित शहा** यांनी फुले यांना समाजमाध्यमांतील पोस्टद्वारे आदरांजली वाहिली. **लोकसभेचे सभापती ओम बिर्ला** म्हटले की ज्योतिबा फुले यांचे आदर्श, विचार आणि संघर्ष भावी पिढ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणा देत राहतील.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दाखल नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण झाली आहे. एकूण १ हजार ५२५ नामनिर्देशन पत्रांपैकी १ हजार ४६३ नामनिर्देशन पत्र वैध ठरली आहेत. दुसऱ्या टप्प्यात १४२ मतदारसंघांसाठी निवडणूका होणार आहेत. तर, येत्या २९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यासाठी निवडणूका होत आहेत. पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांमध्ये १५२ मतदारसंघांत निवडणूका होणार असून एकूण १ हजार ४७८ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आगामी गगनयान मोहिमेसाठी दुसरी एकात्मिक हवाई प्रक्षेपण चाचणी आंध्र प्रदेशात श्रीहरीकोटा इथं यशस्वीरीत्या पार पाडली. अंतराळवीर आपल्या प्रवासादरम्यान ज्या कॅप्सूलमध्ये बसतात ती सुरक्षितपणे परत येण्याच्या दृष्टीने ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. आय ए डी टी १ ही चाचणी गेल्या २४ ऑगस्ट २०२५ रोजी यशस्वी झाल्यानंतर आय ए डी टी २ चाचणी करण्यात आली आहे. हवाई प्रक्षेपण चाचण्यांच्या माध्यमातून अंतराळयान पृथ्वीवर परतण्याच्या शेवटच्या टप्प्याची प्रतिकृती तयार केली जाते. ही चाचणी यशस्वी केल्याबद्दल केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी इसरोचं अभिनंदन केलं आहे. श्रीहरीकोटा इथून २०२७ मध्ये पहिल्या मानवी अंतराळ यानाचं प्रक्षेपण केलं जाणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे परराष्ट्र सचिव राईट आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांच्याबरोबर झालेली आपली बैठक फलदायी झाल्याचं अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जिओ गोर यांनी म्हटलं आहे. भारत अमेरिका ऊर्जा सहकार्याच्या भवितव्याबाबत चर्चा झाल्याची माहितीही त्यांनी दिली. भारताने शाश्वत आणि सर्वंकष अनु तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या प्रगतीबाबतचे ‘शांती’ विधेयकाला मान्यता दिल्याच्या  पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. केवळ नागरी अणूउर्जाच नव्हे तर कोळसा वायूकरण आणि द्रवरूप पेट्रोलियम वायू निर्याती क्षेत्रातही भारतासोबत काम करायची अमेरिकेची तयारी असल्याचं गोर यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री उद्यापासून तीन दिवस पॅरिस आणि बर्लिनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. तिथं मिस्त्री फ्रान्सच्या परराष्ट्र मंत्रालयाचे महासचिव मार्टिन ब्रिएन्स यांच्यासोबत भारत-फ्रान्स परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीचं सह-अध्यक्षपद भूषवतील. संरक्षण, नागरी अणुऊर्जा, अवकाश, सायबर आणि

डिजिटल, एआय, नवोन्मेष, तसंच सांस्कृतिक संबंधांना चालना देणारे उपक्रम यांसारख्या विविध विषयांवर या भेटीत चर्चा होणार आहे. बर्लिनमध्ये, मिस्री जर्मन परराष्ट्र मंत्रालयाचे राज्य सचिव, डॉ. गेझा अँड्रियाज फॉन गेयर यांच्यासह भारत-जर्मनी परराष्ट्र मंत्रालय चर्चेचं सह-अध्यक्षपद भूषवतील. या चर्चेत व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, शिक्षण यांसारख्या द्विपक्षीय सहकार्याच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागात पंचाळे-शहा रस्त्यावर काल मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमाराला ट्रक आणि पिकअप यांच्यात जोरदार धडक होऊन पिकअप कारनं पेट घेतल्यानं चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. पशुखाद्य भरलेल्या ट्रकने दिलेल्या धडकेत पिकअप कार सुमारे १०० फूट ओढत नेली. यात डांबरी रस्त्यावर घर्षण होऊन पिकअप कार पेटली असावी असा अंदाज अग्निशामक दलानं व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

गाझियाबादमधील चार वर्षांच्या मुलीवरील बलात्कार-हत्या प्रकरण धक्कादायक असल्याचं वक्तव्य करत सर्वोच्च न्यायालयानं या प्रकरणी हस्तक्षेप केला. पोलीस आयुक्त आणि तपास अधिकाऱ्याला प्रकरणाच्या कागदपत्रांसह १३ एप्रिल रोजी हजर राहण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिले.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल एम. पांचोली यांच्या पीठानं, पीडितेच्या वडिलांच्या वतीनं हजर असलेले ज्येष्ठ वकील एन. हरिहरन यांचं म्हणणं नोंदवून घेतलं. या प्रकरणात राज्य पोलिसांनी आतापर्यंत ज्या पद्धतीने तपास केला आहे, त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. हे प्रकरण असंवेदनशील पद्धतीनं हाताळल्याबद्दल सरन्यायाधीशांनी राज्याचे पोलीस आणि दोन खासगी रुग्णालयांवर ताशेरे ओढले. या रुग्णालयांनी कथित

बलात्कारानंतर मुलीचा मृत्यू होण्यापूर्वी तिच्यावर उपचार करण्यास नकार दिला होता. १६ मार्चला या बालिकेवर बलात्कार झाला. नंतर एका सरकारी रुग्णालयात तिचा मृत्यू झाला होता.

**<><><><>**

कथित शिक्षक भरती घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्डरिंग प्रकरणात सक्तवसूली संचालनालयानं पश्चिम बंगालचे माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी यांच्या कोलकात्यातल्या काही मालमत्ता आणि इतर ठिकाणी पुन्हा शोध मोहीम हाती घेतली आहे. याबाबत चॅटर्जी यांना तपास अधिकरी यांच्यासमोर तपासणीसाठी हजर राहण्याबाबत  याआधी तीन वेळा समन्स बजावण्यात आले होते. मात्र, ते एकदाही उपस्थित राहिले नाहीत.

**<><><><>**

चीनमध्ये निंगबो इथे सुरु असलेल्या बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीने पुरुष एकेरी गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे भारताचं रौप्यपदक निश्चित झालं आहे. जागतिक मानांकनात २५व्या स्थानावरच्या आयुषने उपांत्यफेरीत अग्रमानांकित आणि गतविजेता थायलंडच्या कुणलावूत वीतिडसन याला तीन गेम्सच्या सामन्यात अटीतटीची झुंज दिली.

अंतिम सामन्यात आयुषचा मुकाबला चिनी तैपेईच्या चौथ्या मानांकित चोऊ तीन चेन किंवा चीनच्या द्वितीय मानांकित शी यु कि बरोबर होईल. भारताच्या दिनेश खन्नाने १९६५ सालामध्ये या स्पर्धेत पुरुष एकेरीत सुवर्णपदक मिळवलं होतं, त्यांनतर आता आयुष शेट्टी हा अंतिम फेरी गाठणारा दुसरा भारतीय ठरला आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज पंजाब किंग्सचा सामना सनराइजर्स हैदराबादशी दुपारी साडेतीन वाजता चंदिगढमध्ये पीसीए क्रिकेट स्टेडियमवर सुरु होणार आहे. आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये होणार

असून हा सामना चेन्नईमध्ये एम ए चिदंबरम स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होणार आहे.  गुवाहाटीमध्ये काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हरवून लागोपाठ चौथा विजय नोंदवला आहे.

**<><><><><>**

कोकण, गोवा, ओडिशा, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकल या भागात आज उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागाने वर्तवली आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**